लोकसत्ता
मुखपृष्ठ Leading International Marathi News Daily
गुरुवार, ६ सप्टेंबर २००७

Jobs Property
Matrimonial
Express

करिअर प्रत्येक बुधवारी | व्हिवा प्रत्येक गुरुवारी | चतुरा प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या रविवारी | लोकरंग प्रत्येक रविवारी | चतुरंग प्रत्येक शनिवारी | वास्तुरंग प्रत्येक शनिवारी

for font problem click here
- राज्य
- प्रादेशिक
- विविध
- क्रीडा
- अग्रलेख
- व्यक्तिवेध
- विशेष लेख
- लोकमानस
- इ-मानस
- राशिभविष्य
- प्रतिक्रिया
- मागील अंक

विशेष वृत्तांत
मुंबई वृत्तान्त
ठाणे वृत्तान्त
नवी मुंबई वृत्तान्त
महाराष्ट्र वृत्तान्त
पुणे वृत्तान्त
नवनीत

(सविस्तर वृत्त)

## सृष्टीसौंदर्य खुलवणारे स्थलांतरित पक्षी

**सुहास जोशी**

सरत्या पावसाळ्यात विविधरंगी फुलांनी बहरलेले सृष्टीसौंदर्य अधिकच खुलते ते तशाच मनमोहक नानारंगी आकर्षक अशा पाहुण्या-स्थलांतरित पक्ष्यांनी. हिवाळ्याच्या तोंडावर येणारे फ्लेमिंगो तर मुंबईकरांना चांगलेच परिचित, तर मोठ्या थव्याने जोरात आवाज करीत उडणारी गुलाबी चोचीची पळसमैना, खाडीकिनारी भेटणारा हिरव्या डोक्याचा सगऱ्या असे अनेक स्थलांतरित पक्षी अभ्यासकांना साद घालतात. या स्थलांतरितांचे भारतातले प्रमाण सुमारे तीस टक्के इतके असले तरी आजमितीला त्यांच्या स्थलांतरणाच्या प्रवासाची ठोस अशी शास्त्रीय आकडेवारी उपलब्ध नाही. 'ग्लोबल वॉर्मिंग'मुळे त्यांच्या प्रवासावर परिणाम होत आहे, पण आकडेवारी नाही. नेमका हाच कच्चा दुवा पकडून 'इंडियन बर्डस्' या भारतीय पक्ष्यांवरील अभ्यास मासिकाने 'मायग्रंट वॉच २००७' हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला आहे.

बेंगलोरच्या 'नॅशनल सेंटर फॉर बायोलॉजिकल सायन्सेस' या संस्थेच्या सहकार्याने संपूर्ण भारतभरातील स्थलांतरित पक्ष्यांचा ऑगस्ट २००७ ते एप्रिल २००८ दरम्यान अभ्यास प्रथमच होणार आहे. 'सिटिझन सायन्स फॉर इकॉलॉजी ॲण्ड कॉन्झर्वेशन'च्या माध्यमातून सुरुवातीस नऊ प्रजातींची साद्यंत माहिती संकलित केली जाणार आहे. प्रकल्पाची सुरुवात असल्यामुळे सर्वसाधारणपणे सर्वत्र आढळणारे असे नऊ स्थलांतरित पक्षी यासाठी निवडण्यात आले आहेत. आपल्या परिसरातील प्रथम आगमनाची नोंद व पुढे संपूर्ण हिवाळ्यातील त्याची वास्तव्यावरील नोंद अशा दोन पातळ्यांवर हा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. जागतिक स्तरावर प्रचंड वेगाने होत असणाऱ्या पर्यावरणातील बदलांमुळे पक्ष्यांच्या स्थलांतरणावरदेखील परिणाम होतात. मायग्रंट वॉचमुळे या पक्ष्यांच्या आगमन, प्रस्थान, वास्तव्याचा अभ्यास होऊन त्याबद्दल ठोस निष्कर्ष काढणे शक्य होईल. तसेच जागतिक पर्यावरणातील धोक्यांचा पण अभ्यास होऊ शकेल, अशी अपेक्षा या प्रकल्पाचे समन्वयक सुहेल कादर (बेंगलोर) यांनी व्यक्त केली. यासाठी गरज आहे ती मात्र मोठ्या प्रमाणात पक्षीनिरीक्षक स्वयंसेवकांची. त्या आधारे आपल्या रोजच्या वावरण्याच्या परिसरात (शाळा, कॉलेज, कामाची ठिकाणे, उद्याने) त्यांची नोंद करू शकता. रोजच्या धकाधकीत जरी ते शक्य नसले तरी आठवड्याने एखाद्या ठराविक ठिकाणी पक्षी निरीक्षणासाठी भेट देणाऱ्या जागीदेखील याच्या नोंदी ठेवू शकतो. मुंबईकर पक्षीनिरीक्षकदेखील यामध्ये मागे नाहीत. तज्ज्ञ पक्षीनिरीक्षक आदेश शिवकर आणि मुंबई बर्ड क्लब यांनी मायग्रंट वॉचच्या दुसऱ्या पातळीवरील नोंदीमध्ये आपला सहभाग ठेवला आहे. उरण खाडी आणि नॅशनल पार्क येथे निरीक्षणं चालू आहेत. निसर्गात भटकंतीचा नुसताच आनंद न मिळविता त्याबरोबरच थोडे अधिक परिश्रम घेऊन अशा प्रकारच्या अभ्यासाला सहजपणे हातभार लावता येऊ शकतो.

६६६.ल्लु२.पी२.ल्ल/३२ाि या संकेतस्थळावर सर्व मार्गदर्शक गोष्टींची माहिती, ऑडिओ कॉईल्स उपलब्ध आहेत.

**'मायग्रंट वॉच'अंतर्गत अभ्यास करण्यात येणाऱ्या प्रजाती.**

१) नॉदर्न शॉवेलर
२) मार्श हॅरियर (हरित ससाणा)
३) वुड सॅण्डपाइपर
(ठिपकेवाला तुतारी)
४) कॉमन स्वॉलो (भिंगरी)
५) ग्रे वॅगटेल (राखाडी धोबी) ६) ब्राऊन श्राईक (खाटिक)
७) ब्लॅक रेडस्टार्ट (कापऱ्या/थिरथिऱ्या)
८) ग्रीनिश वॉरब्लेर (हंगु'ी१)
९) रोझी स्टर्लिंग (ओरडी)

A special i
Loksatta
reader
North Ar
MAHARA
INTERNAT
Loksat
changin
click on the imag
ENTRY
express
LIVE
Populati
Advertis
Monsoon
Exciting
packa
Shaadi Mat
10 Million+
Million+
25000 Re
Are Waiting @
Flowers
Send flowe
Express C
Post and
classifie
Make Ro
happ
On Fropper R
Express A
Know what's
for y
Advertise
इंडियन एक्सप्रेस ग्रुप
Matrimonials
Register Free @ naukri.com
Monsoon Holidays @